# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./ १२०९/२०२०     दि. १६/०३/२०२०

## परिपत्रक

**विषय:- राज्यात कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) चा प्रार्दुभाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.**

संदर्भ:- १) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. करोना२०२०/प्र. क्र. ५८/आरोग्य-५, दिनांक १४ मार्च, २०२०

२) उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. संकीर्ण - २०२०/स.क्र.११४/२०/विशि-१ दिनांक १४ मार्च, २०२०

३) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिस/कोरोना/मवि-१/२०२०/३७७८, दिनांक १४ मार्च, २०२०

४) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र. उशिनाग/आस्था/सर्व महा/१४३४/२०२०, दिनांक १४ मार्च, २०२०

५) सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचे पत्र क्र. करोना२०२०/प्र. क्र. ५८/आरोग्य-५, दिनांक १५ मार्च, २०२०

६) शासन पत्र क्र. संकीर्ण २०२०/(सं.क्र)/(११४/२०)/विशि-१, दिनांक १६ मार्च, २०२०

७) संचालनालयाचे पत्र क्र. उशिस/कोरोना/मवि-१/२०२०/३७८७, दिनांक १६ मार्च, २०२०

८) शासन पत्र क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र. ६०/२०/तांशि-१, दिनांक १६ मार्च, २०२०

९) संचालनालयाचे पत्र क्र. उशिस/कोरोना/मवि-१/२०२०/३८१९ , दिनांक १६ मार्च, २०२०

उपरोक्त विषयाबाबत शासन पत्र क्र. संकीर्ण -२०२०/प्र.क्र.६०/२०/ताशि-१ दिनांक १६ मार्च, २०२० ची प्रत सोबत जोडलेली आहे. अवलोकन करावे.

सदर पत्रात नमुद केल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सुचना सर्व अकृषी/अभिमत/स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे तसेच शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विनाअनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्यालये/वसतिगृहे व परिसंस्था यांना देण्यात याव्यात व त्याबाबतचा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यासंदर्भात ई-मेलव्दारा पत्र प्राप्त झाले आहे.

त्याअनुषंगाने शासन पत्र क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.६०/२०/तांशि-१, दिनांक १६/०३/२०२० अन्वये कार्यवाही घ्यावी व त्वरीत अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा जेणेकरून शासनास अहवाल सादर करता येईल.

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)

**कुलसचिव**

**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा. सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
५. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव सादर.
६. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य यांना आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
७. विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख, यांना आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
८. विद्यापीठाचे सर्व प्रशासकीय विभाग/युनिट प्रमुख यांना आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

महाराष्ट्र शासन

तात्काळ

क्रमांक : संकिर्ण-२०२०/प्र.क्र. ६०/२०/तांशि-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दि. १६ मार्च, २०२०.

प्रति,
१. मा. कुलगुरु,
सर्व अकृषी /अभिमत/तंत्रशास्त्र/स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे.
२.संचालक,उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य , पुणे.
३.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई .
४.संचालक,कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई .
५.संचालक,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई

विषय : राज्यात करोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत....

संदर्भ : १. सार्वजनिक आरोग्य विभाग,पत्र क्र. करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५, दि.१४/०३/२०२०.
२. सार्वजनिक आरोग्य विभाग,पत्र क्र. करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५, दि.१५/०३/२०२०.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांची संदर्भाधिन पत्रे कृपया पहावित.

२. शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दि.१३/०३/२०२० पासून लागू करुन खंड-२, ३ व ४ मधील तरतुदींनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

३. करोना विषाणूचा होणारा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका,सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदींनुसार दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत संदर्भाधिन क्र.१ येथील पत्राव्दारे सूचित करण्यात आले आहे.

४. तथापि या सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील इयत्ता १० वी , इयत्ता १२ वी तसेच विश्वविद्यालयांची प्रात्यक्षिके व परीक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आला आहे.तसेच आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही, यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना देखील संदर्भाधिन क्र.१ येथील पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

५. त्या अनुषंगाने तंत्र शिक्षण/कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी/अनुदानित/खाजगी शैक्षणिक संस्था/महाविद्यालये/ अकृषि विद्यापिठे दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत आपल्या स्तरावरुन

सर्व संस्थाप्रमुखांना तात्काळ सूचित करण्यात यावे व त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा असे या विभागाच्या दि.१४.०३.२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

६. आता सार्वजनिक आरोग्य विभागाने संदर्भाधिन क्र.२ येथील पत्रान्वये दिलेल्या सुचनेस अनुसरून सर्व संबंधितांना खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या दि.१४/०३/२०२० व दि.१५/०३/२०२० च्या पत्रान्वये दिलेल्या सुचना लक्षात घेता,नागरी भागासोबतच राज्यातील ग्रामीण भागातील सर्व सरकारी /अनुदानित / खाजगी शैक्षणिक संस्था / महाविद्यालये / अकृषि विद्यापिठे /तंत्रशास्त्र विद्यापीठे/तंत्रनिकेतने/अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/वसतीगृहे दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद राहतील.

२) तंत्र शिक्षण/ उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विद्यापीठे /तंत्रशास्त्र विद्यापीठे /सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे/सर्व अभिमत विद्यापीठे व त्यांच्याशी संबंधित सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानित,विनाअनुदानित,कायम विनाअनुदानित /मॉडेल डिग्री महाविद्यालये/तंत्रनिकेतने/अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये /वसतीगृहे व परिसंस्था तसेच कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्था/वसतीगृहे दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद राहतील.

३) राज्यातील सर्व सरकारी /अनुदानित / खाजगी शैक्षणिक संस्था / महाविद्यालये / अकृषि विद्यापिठे/तंत्रशास्त्र विद्यापीठे /तंत्रनिकेतने/अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/कला महाविद्यालये यांच्या **दि.३१/०३/२०२० पर्यंत होणा-या सर्व परीक्षा व प्रात्यक्षिके पुढे ढकलण्यात येत आहेत.** दि.०१/०४/२०२० पासूनची परीक्षा व प्रात्यक्षिके पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार होतील.

४) सर्व सरकारी / अनुदानित / खाजगी शैक्षणिक संस्था / महाविद्यालये / अकृषि विद्यापिठे /तंत्रशास्त्र विद्यापीठे /तंत्रनिकेतने/ अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/कला महाविद्यालये या मधील सर्व अध्यापक हे दि.२५/०३/२०२० पर्यंत घरी राहून कामकाज (Work From Home) करु शकतील.

तथापि, आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास /प्रशासकीय कारणास्तव संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु/ उपकुलगुरु/ कुलसचिव/ उपकुलसचिव तसेच महाविद्यालयाचे / तंत्रनिकेतनांचे प्राचार्य /संचालक/अधिष्ठाता यांनी निर्देश दिल्यास त्यानुसार अध्यापकांना संस्थेमध्ये तातडीने हजर राहणे बंधनकारक राहील.

५) विद्यापीठाचे कुलगुरु/उपकुलगुरु/कुलसचिव/उपकुलसचिव तसेच महाविद्यालयाचे /तंत्रनिकेतनांचे प्राचार्य/ संचालक /अधिष्ठाता व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी नियमितरित्या कार्यालयामध्ये उपस्थित राहणे आवश्यक आहे.

६) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत दि.३१/०३/२०२० पर्यंत आयोजित केलेल्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहेत.

७) उपरोक्त उपाययोजनांबाबत आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाहीच्या सुचना वेळोवेळी देण्यात येतील.

(सतीश ज. तिडके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-माहितीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाही करिता,

१. मा. राज्यपालांचे सचिव,राजभवन,मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री,उच्च तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री,उच्च तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सचिव,उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई.
८. सर्व विभागीय आयुक्त.
९. सर्व जिल्हाधिकारी.
१०. निवडनस्ती-तांशि-१

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.**

Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३.

क्र.उशिंस/कोरोना/मवि-१/२०२०/३८७९ दिनांक-१६/०३/२०२०.

**ईमेलद्वारा/अतितात्काळ** 16 MAR 2020

प्रति,

१ मा. कुलगुरु
सर्व अकृषि/अभिमत/स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे.

२ विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य.

विषय- राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत...

संदर्भ- १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे पत्र क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५, दिनांक १४.०३.२०२०
२. शासनपत्र क्र.संकीर्ण-२०२०/(सं.क्र.) /(११४/२०)/विशि-१,दिनांक १४.०३.२०२०.
३. संचालनालयाचे पत्र क्र.उशिंस/कोरोना/मवि-१/२०२०/३७७८, दिनांक १४.०३.२०२०
४. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे पत्र क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५, दिनांक १५.०३.२०२०.
५.शासनपत्र क्र.संकीर्ण-२०२०/(सं.क्र.) /(११४/२०)/विशि-१, दनांक १६.०३.२०२०.
६. संचालनालयाचे पत्र क्र.उशिंस/कोरोना/मवि-१/२०२०/३७८७, दिनांक १६.०३.२०२०
७. शासनपत्र क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.६०/२०/तांशि-१, दिनांक १६.०३.२०२०.

उपरोक्त विषयाबाबत शासनपत्र क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.६०/२०/तांशि-१, दिनांक १६.०३.२०२० ची प्रत सोबत जोडली आहे. अवलोकन करावे.

सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सुचना सर्व अकृषि/अभिमत/स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे तसेच शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्याले/वसतीगृहे व परिसंस्था यांना देण्यात याव्यात व त्याबाबतचा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करावा.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत- संचालक/प्राचार्य, शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्याले/वसतीगृहे व परिसंस्था यांना आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

D:\March 2020\Coronavirus.docx

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

# (कुलसचिव कार्यालय)


एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२२३१०४

**E-Mail** : gug.registrar@gmail.com


जा.क्र./गोंवीग/कुसका/३७६६/२०२० दिनांक १५/०३/२०२०

## परिपत्रक

**विषय :– राज्यात कोरोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.**

संदर्भ :–
१) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक करोना २०२०/प्र.क्र.५८/आयोग्य–५, दिनांक १४ मार्च २०२०.
२) उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट शासन यांचे पत्र क्रमांक संकिर्ण–२०२०/सं.क्र.११४/२०/विशि–१, दिनांक १४ मार्च २०२०.
३) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक उशिस/कोरोना/मवि–१/२०२०/३७७८, दिनांक १४ मार्च २०२०.
४) सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्रमांक उशिनाग/आस्था/सर्व महा/१४३४/२०२०, दिनांक १४ मार्च २०२०.

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्रान्वये शासनाद्वारे कोरोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करण्यात आल्याचे व कोरोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालय, आयुक्त व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ मधील तरतुदीनुसार दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत, तथापि, या सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या तसेच विद्यापीठांच्या प्रात्यक्षिके व परीक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आला असल्याचे कळविले आहे.

**महाराष्ट्र शासनाच्या वरील संदर्भिय पत्रांना अनुसरून कोरोना विषाणूच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधक उपाययोजनेच्या दृष्टीने खालील आदेश निर्गमित करण्यात येत आहे.**

१. विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभागांतील व संलग्नित महाविद्यालयातील अध्यापनाचे कामकाज दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद राहील, मात्र सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील व संलग्नित महाविद्यालयातील तसेच प्रशासकीय विभागातील प्रशासकीय व इतर आवश्यक कामकाज सुरू राहील.

२. ज्या विद्यार्थ्यांना सुटी दिलेली आहे, ते अनावश्यकरित्या फिरणार नाहीत तसेच वसतिगृहामध्ये, त्यांच्या घरामध्ये स्वत:ला सुरक्षित ठेवतील अशा स्पष्ट सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. अन्यथा त्यांना त्यांच्या मूळ गावी जाण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. जे विद्यार्थी विद्यापीठ परिक्षेत्रात राहतील त्यांच्याही निदर्शनास ही बाब आणावी. कोणी अनावश्यकरित्या शहरात फिरतांना आढळल्यास त्यांच्याविरूध्द कार्यवाही होऊ शकेल, याची जाणीव त्यांना द्यावी.

३. विद्यापीठाच्या परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार होतील. उपरोक्तप्रमाणे जी बंधने घालण्यात आलेली आहेत ती बंधने परीक्षार्थी विद्यार्थ्यांना लागू राहणार नाहीत. त्यासाठी त्यांनी परीक्षेचे प्रवेशपत्र (हॉल तिकीट) व ओळखपत्र सोबत बाळगावे व आवश्यक असल्यास ते दर्शवावे. परीक्षेच्या वेळी आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी संबंधितांनी घ्यावी. परीक्षेबाबत शासनाचे काही वेगळे आदेश प्राप्त झाल्यास तसे कळविण्यात येईल.

४. विद्यापीठ परीसरातील वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर कालावधीत त्यांच्या मूळ गावी जाण्याच्या पर्याय उपलब्ध आहे. या काळात वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने शक्यतो वसतीगृहाबाहेर जाऊ नये.

५. प्रतिबंधक उपाय योजनेच्या दृष्टीने विद्यापीठाच्या विभागातील, संलग्नित महाविद्यालयातील खालील सुविधा सदर कालावधीत बंद राहतील.

- वाचनकक्ष, कमवा व शिका योजना व सर्व क्रिडा सुविधा.

६. विद्यापीठात पुर्वपरवानगीशिवाय सर्व अभ्यागतांना सदर कालावधीसाठी प्रवेश वर्जित करण्यात येत आहे.

७. विद्यापीठाच्या प्रवेशद्वारातूनच केवळ विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी यांना शक्यतोवर विद्यापीठाने दिलेले ओळखपत्र पाहूनच प्रवेश दिला जाईल.

८. बायोमॅट्रीक व्यवस्था सदर कालावधीत बंद राहील.

**(डॉ. ईश्वर मोहुर्ले)**
कुलसचिव

**प्रतिलिपी माहितीकरीता अग्रेषित :**

१. विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभागाचे सर्व विभाग प्रमुख.
२. विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य.
३. विद्यापीठाच्या वसतीगृहांचे वार्डन व अधिक्षक.
४. विद्यापीठातील सर्व अधिकारी व युनिटप्रमुख यांनी उपरोक्त परिपत्रकानुसार आपल्या स्तरावर आवश्यक कार्यवाही घ्यावी.